**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**

(सकाळ)

जा.क्र. ४५५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०६/२०१७

**१) बिएसएनएल कार्यालय स्टोर यार्डचे परीसरातील ठंवलेले लोखंडी नट बोल्ड चोरी केल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक १५/०६/२०१७ चे पुर्वी यातील फिर्यादी लोकेश्वर कटरे वय ५० वर्ष, रा. सिव्हील लाईन भंडारा यांचे बिएसएनएल कार्यालय स्टोर यार्ड चे परीसरात ठेवलेले लोखंडी नट बोल्ड ८६ नग किंमती ५५,०००/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन अश्लिल शब्दात भांडण व शिवीगाळ करुन प्लॅस्टीक पाण्याची बाटली व खुर्चीने मारुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक १७/०६/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आपले घरी बसली असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तु माझ्या आई सोबत भांडण का केले असे म्हणुन फिर्यादीचे केस पकडुन प्लॅस्टीकची पाण्याची बाटली फिर्यादीचे छातीवर मारुन व प्लॅस्टीक खुर्ची डोक्यावर मारुन धक्का बुक्की करुन घराचे बाहेर काढुन केस पकडुन विनयभंग केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४,२९४,५०४,३२३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन कचरा पेटविण्याच्या कारणावरुन कुन्हाडीचे दांडयाने डोक्यावर, शरीरावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक १७/०६/२०१७ चे १८.३० वा. दर. यातील जखमी फिर्यादी नारायणजी सोनबाजी बडवाईक वय ६५ वर्ष, रा. सातोना हा ठेक्याने केलेल्या ओरापींच्या भावाच्या शेतात कचरा पेटवित असतांना 'तु कचरा का पेटवितो' असे म्हणुन आरापीतांनी संगनमत करुन आरोपी क्र. २ ने फिर्यादीस धरुन ठेवुन आरोपी क्र १ ने कुन्हाडीचे दांडयाने डोक्यावर, नाकावर, पायाचे पोटरीवर व पाठीवर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३४२,३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) देह विक्रीचा व्यवसाय करतांनी साहित्यासह व नगदी पैश्यासह मिळुन आल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक १७/०६/२०१७ चे २३.४५ वा. दर. यातील आरोपी क्र. १ ही आरोपी क्र. २ च्या माध्यामतुन स्वतःचे आर्थीक लाभा करीता देह विक्रीचा व्यवसाय करण्या करीता पिडीत महीला यांना प्रवृत्त केले व आरोपी क्र. ३ व ४ हे शारीरीक संबध प्रस्थापीत करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने व त्यांचे पासुन मॅनफोर्स कंपनीचे ७ सिलबंद कॉन्डम व ५००/—रु. दराची चलनी नोट क्र. ६ बिएम ची मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. झंझाड स्थागुशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३,४,५(१)(क) स्त्रीयांचा अनैतीक व्यापार प्रती. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कुंभरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) कुंपणाच्या जागेच्या वादावरुन अश्लिल शब्दात भांडण व शिवीगाळ करुन हात मुरकटवुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक १८/०६/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांच्या शेजारी राहत असुन त्यांच्या कुंपण्याच्या जागेच्या वादावरुन जुने भांडण आहेत आरोपी क्र. १ व २ यांनी आपले घराचे कुंपणाच्या जागेत वाल कंपाऊन्ड तयार करण्या करीता नाली खोदत असतांना फिर्यादीने हटकले की ही जागा आमची आहे असे बोलल्याने आरोपीने तोंडा तोंडी भांडण करुन व आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन हात मुरकटवुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. वर्षा परमानंद साखरे वय ४४ वर्ष, रा. घानोळ यांचे तोंडी व रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,३२३,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडगे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक १६/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, साकोली, पवनी व लाखांदुर येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दारु, किंमती १,०००/—रु, २० लिटर ७०० मिली लिटर देशी दारु+ खुर्च्या किंमती ६४३०/—रु. असा एकुण किंमती ७,४३०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.